पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल ® सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर






# स्मारकाच्या कामात खोडा घालून दिशाभूल करू नका : दिलीप पुंड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा संगमनेर शहरासाठी केवळ विकास प्रकल्प नसून, प्रत्येक संगमनेरकराच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा विषय आहे. त्यामुळे संगमनेरकरांच्या अपेक्षांना पूर्णपणे न्याय देणारे भव्य-दिव्य आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारे स्मारक उभारण्यात येईल. स्मारकाच्या उभारणीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी भूमिका माजी नगराध्यक्ष दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केली.



स्मारकासाठी आवश्यक असलेल्या वाढीव जागेचा प्रश्न गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित आहे. परिवहन व नगरविकास खाते संबंधितांकडे असतानाही हा प्रश्न का मार्गी लागला नाही, असा सवाल पुंड यांनी उपस्थित केला. शासनस्तरावर हा प्रश्न सोडविण्यासाठी पुरेसा कालावधी आणि संधी उपलब्ध असतानाही वाढीव जागेचा निर्णय झाला नाही. आता नगरपालिका स्मारकाचे प्रत्यक्ष काम पुढे नेण्याचा प्रयत्न करत असताना त्यावर आक्षेप घेणे हा विरोधाभास असल्याचे त्यांनी म्हटले. स्मारकाच्या कामाला गती मिळत असताना त्यात अडथळे निर्माण करण्याऐवजी ते अधिक भव्य आणि आकर्षक कसे होईल, यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. वाढीव जागा उपलब्ध झाल्यास तिचा उपयोग स्मारकाचा परिसर प्रशस्त करण्यासाठी, सुशोभीकरण तसेच नागरिकांसाठी आवश्यक सुविधांसाठी करण्यात येईल. मात्र वाढीव जागेच्या मुद्द्यावरून सुरू असलेली प्रक्रिया थांबविणे योग्य ठरणार नाही, असे पुंड यांनी स्पष्ट केले. आ. सत्यजीत तांबे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी यापूर्वीच स्पष्ट भूमिका घेत सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यानंतर नगरपालिकेनेही स्मारकाच्या प्रत्यक्ष उभारणीच्या दृष्टीने नियोजन सुरू केले आहे. त्यामुळे या विषयाला राजकीय वादाचे स्वरूप न देता कामाला गती देणे महत्त्वाचे असल्याचे पुंड यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा विषय नसून संपूर्ण संगमनेरचा विषय आहे. त्यामुळे राजकारण न आणता सर्वांनी एकत्र येऊन संगमनेरकरांच्या अपेक्षेप्रमाणे भव्य-दिव्य स्मारक उभारण्यासाठी योगदान द्यावे. संगमनेरकरांच्या मनातील स्मारकच प्रत्यक्षात साकारले जाईल, असा विश्वास दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केला.

# शिवस्मारक भव्य जागेत उभारण्यास सत्ताधाऱ्यांचाच खोडा- अभिजीत पुंड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक वाढीव जागेतच करण्याबाबत महायुती सरकार योग्य निर्णय करेल. छोट्या जागेत स्मारक करून जनतेच्या मनात असलेल्या भव्य स्मारकाच्या कामात खोडा घालण्याचे पाप पालिकेतील सेवा समितीने करू नये असा इशारा शिवसेनेचे कार्यकर्ते अभिजीत पुंड यांनी दिला आहे.

स्वता: अनेक वर्ष नगराध्यक्ष असताना कधी महाराजांच्या स्मारकाचा विषय काढण्याची आठवण न झालेल्या नगरसेवक दिलीप पुंड यांनी महायुती सरकारवर टिका करून आपले हसू करून घेवू नये आशी खरमरीत टिकाही अभिजीत पुंड यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत दिलीप पुंड यांनी काढलेल्या पत्रकावर टिका करताना अभिजीत पुंड म्हणाले की, शहरात भव्य स्मारक उभारण्याची संकल्पना ही मुळातच महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची आहे. आ. अमोल खताळ यांनी निवडून येण्यापुर्वीच स्मारकासाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा सुरू केला होता. केवळ श्रेय लाटण्यासाठी पालिकेत घाई घाईने ठराव केल्याचा सोयीस्कर विसर दिलीप पुंड यांना कसा पडला. शहरात बस स्थानकाचे काम सुरू असताना महाराजांच्या स्मारकाला जागा ठेवण्याची आठवणही तुम्हाला राहीली नाही. तेव्हा तर राज्यात आणि पालिकेत सत्ता तुमच्या पक्षाची होती.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक भव्य दिव्य आणि त्यांच्या



कर्तृत्वाला साजेसे व्हावे या उद्देशाने आ. खताळ वाढीव जागेसाठी पाठपुरावा करीत असून लवकरच त्यांच्या प्रयत्नांना यश येईल हा विश्वास महायुतीच्या कार्यकर्त्यांना आहे. ज्यांना इतकी वर्षे महाराजाचे स्मारक उभारण्याची आठवण झाली नाही त्यांना वास्तविक दिलीप पुंड यांनी प्रश्न विचारायला हवा होता. विशेष म्हणजे स्वत: अनेक वर्ष पालिकेत नगरसेवक, नगराध्यक्ष पद भुषवले तेव्हा सुध्दा महाराजांचे स्मारक करता आले नाही. आता केवळ नगराध्यक्षांची मर्जी राखण्याची वेळ आपल्यावर आल्यामुळे त्यांनी लिहून दिलेल्या स्क्रिप्टवरून थेट महायुती सरकारवर करीत असलेली टिका म्हणजे स्वता: चे हसू करून घेण्यासारखे असल्याचे अभिजीत पुंड म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय राजकारणाचा नाही. परंतू तुम्हीच पत्रकबाजी करून या विषयाचे राजकाराण करीत आहात. स्मारकासाठीच्या वाढीव जागेचा प्रस्ताव मंजूर होईपर्यत छोट्या जागेत स्मारकाचे काम करू नये ही संगमनेरच्या जनतेची आणि शिवप्रेमीची मागणी आहे..

# नाशिक-पुणे रेल्वेवर 'अधिसूचना विरुद्ध समिती'चा पेच ! संगमनेर- अकोलेत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम

युवावार्ता - संगमनेर उत्तर पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या बहुचर्चित नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे मार्गावरून पुन्हा एकदा संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. केंद्र सरकारने ६ ऑगस्ट रोजी राजपत्रात भूसंपादनाची अधिसूचना जारी केली. तर त्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करून ६० दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यामुळे समितीचा अहवाल येण्यापूर्वीच भूसंपादनाची अधिसूचना कशी काय जारी झाली असा सवाल संगमनेर-अकोले परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांकडून उपस्थित होत आहे.केंद्राच्या राजपत्रातील अधिसूचना क्र. ४१७५ नुसार रेल्वे प्रकल्पाच्या निर्मिती, अंमलबजावणी, देखभाल आणि संचालनासाठी आवश्यक जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली



आहे. या अधिसूचनेमुळे प्रस्तावित रेल्वे मार्ग शिर्डी-पुणतांबा-अहिल्यानगरमार्गेच जाणार असल्याचे स्पष्ट होत असल्याचे मानले जात आहे.

अधिसूचना प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत बाधित व्यक्ती किंवा शेतकऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडे लेखी आक्षेप नोंदविता येणार आहेत. या प्रकरणी शिर्डीचे उपविभागीय अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असून बाधितांची वैयक्तिक अथवा कायदेशीर प्रतिनिधीमार्फत सुनावणी घेतली जाणार आहे.

२७५ हेक्टर जमीन अडकली; 'महारेल'ची नोंद कायम- नाशिक-पुणे रेल्वेच्या जुन्या आराखड्यानुसार संगमनेर तालुक्यातील २६ गावांमधील सुमारे २७५ हेक्टर जमिनीची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली असून अनेक शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर 'महारेल'ची नोंद करण्यात आली आहे. मात्र, मार्गच शिर्डीकडे वळवल्याने शेतकऱ्यांना ना रेल्वेचा लाभ मिळाला, ना त्यांच्या जमिनीवरील 'महारेल'ची नोंद हटली. परिणामी जमिनींचे व्यवहारही रखडल्याने शेतकरी प्रशासकीय कात्रीत सापडले आहेत. नाशिक-पुणे रेल्वेचा मूळ आराखडा संगमनेर-नारायणगावमार्गे होता. तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी २००९च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर सर्वेक्षण आणि भूसंपादनाची प्रक्रिया पुढे सरकली होती. संगमनेर तालुक्यात सुमारे २९३ हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन करण्यात आले होते.

मात्र, त्यानंतर रेल्वे मार्ग शिर्डी, पुणतांबा आणि अहिल्यानगरमार्गे वळविण्याचा निर्णय झाल्याने संगमनेर-अकोले भागात तीव्र नाराजी निर्माण झाली. जुन्या मार्गानेच रेल्वे नेण्यात यावी, या मागणीसाठी आंदोलनांची मालिकाही सुरू झाली. काकोडकर समितीच्या अहवालाकडे लक्ष - मार्गबदलाच्या प्रश्नावर आमदार सत्यजीत तांबे यांनी विधान परिषदेत आक्रमक भूमिका मांडल्यानंतर राज्य सरकारने डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली (पान २ वर)

सिल्क फेस्टीवल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडसच्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल ™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सोन्याच्या दागिन्यांची मजुरी फक्त 7%
मुदत फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
PBM Jeweller's
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदीवर 30% DISCOUNT
ऑफर फक्त 3 सप्टेंबरपर्यंत
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर चावडी जवळ, संगमनेर
7599996999 / 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# संपादकीय...

## महागाईच्या कचाट्यात कुटुंबाची बचत आणि भविष्य

महागाई हा आज केवळ अर्थव्यवस्थेतील एक आकडा राहिलेला नाही, तर तो सर्वसामान्यांच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. महिन्याच्या सुरुवातीला हातात येणारा पगार आणि महिनाअखेरीस उरलेली रक्कम यातील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना अन्नधान्य, शिक्षण, आरोग्य, वीज, घरभाडे, प्रवास, इंधन आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या खर्चामुळे मध्यमवर्गीय आणि कष्टकरी कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. घर चालवताना गरजा कमी कराव्यात की बचत थांबवावी, हा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा आहे. महागाईचा सर्वाधिक परिणाम स्वयंपाकघरावर जाणवतो. किराणा दुकानात महिन्याचा सामानाचा हिशोब करताना पूर्वीपेक्षा अधिक पैसे मोजावे लागतात. डाळी, खाद्यतेल, तांदूळ, गहू, भाजीपाला, फळे, दूध अशा मूलभूत वस्तूंच्या किमती वाढल्या की त्याचा थेट परिणाम घराच्या बजेटवर होतो. एखाद्या वस्तूची किंमत काही रुपयांनी वाढली, तर ती किरकोळ बाब वाटू शकते; मात्र अशा अनेक छोट्या वाढी एकत्रित झाल्यावर महिन्याचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. परिणामी अनेक कुटुंबे पौष्टिक आहाराऐवजी परवडणाऱ्या पर्यायांकडे वळतात. याचा परिणाम विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता असते. महागाईची दुसरी मोठी झळ शिक्षणाला बसत आहे. मुलांच्या शिक्षणासाठी शाळेची फी, वह्या-पुस्तके, गणवेश, प्रवास, क्लासेस आणि विविध शैक्षणिक उपक्रमांवर होणारा खर्च वाढत आहे. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने चांगले शिक्षण घ्यावे, मोठे व्हावे, अशी इच्छा असते. मात्र वाढत्या खर्चामुळे अनेक पालकांना आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा शिक्षणासाठी राखून ठेवावा लागतो. उच्च शिक्षणाचा खर्च तर आणखी मोठा आहे. त्यामुळे शिक्षणासाठी कर्ज घेण्याची किंवा बचत मोडण्याची वेळ अनेक कुटुंबांवर येते. आरोग्याच्या बाबतीतही परिस्थिती गंभीर आहे. आजारपण सांगून येत नाही; मात्र उपचारांचा खर्च निश्चितच आर्थिक धक्का देतो. डॉक्टरांची फी, तपासण्या, औषधे, रुग्णालयातील खर्च आणि त्यासोबत कामाचे होणारे नुकसान यामुळे एका आजाराने संपूर्ण कुटुंबाचे आर्थिक नियोजन विस्कळीत होऊ शकते. त्यामुळे आरोग्य विम्याची गरज वाढत असली तरी त्याचा खर्चही सामान्य कुटुंबासाठी विचार करण्याचा विषय आहे. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे तत्त्व सर्वमान्य असले, तरी महागाईच्या काळात आरोग्य जपणेही खर्चिक होत चालले आहे. वाहतूक आणि इंधनाच्या खर्चानेही सामान्य नागरिकांच्या खिशावर ताण वाढवला आहे. कामासाठी दररोज प्रवास करणाऱ्या व्यक्तीच्या महिन्याच्या उत्पन्नातील मोठी रक्कम प्रवासावर खर्च होते. पेट्रोल-डिझेलच्या किमतीतील बदलांचा परिणाम केवळ वाहनधारकांवर होत नाही; वाहतूक खर्च वाढल्याने अनेक वस्तूंच्या किमतीही प्रभावित होतात. त्यामुळे महागाईची साखळी बाजारातील एका घटकापुरती मर्यादित राहत नाही. या सगळ्यात सर्वाधिक अडचण आहे ती निश्चित उत्पन्न असलेल्या कुटुंबांची. पगार ठरलेला असतो; मात्र खर्च निश्चित नसतो. घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, सामाजिक समारंभ, कर्जाचे हप्ते आणि भविष्यासाठीची बचत यामध्ये समतोल साधताना कुटुंबप्रमुखाची अक्षरशः कसरत होते. अनेक जण अनावश्यक खर्च कमी करतात, मनोरंजन पुढे ढकलतात, मोठ्या खरेदीचा निर्णय लांबवतात आणि बचतीतून घरखर्च भागवतात. परंतु बचत कमी झाली की भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

# नाशिक-पुणे रेल्वेवर...

पान १ वरून - उच्चस्तरीय समिती स्थापन केली. जुन्या आणि नव्या मार्गाची व्यवहार्यता, खर्च आणि अन्य बाबींचा अभ्यास करून समिती ६० दिवसांत अहवाल देणार आहे. दरम्यान, राज्य समितीचा अहवाल येण्यापूर्वीच केंद्राने भूसंपादनाची अधिसूचना काढल्याने 'नक्की रेल्वेचा मार्ग कोणता?' हा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. जुन्या मार्गाचा खर्च अधिक असल्याने सुमारे ८ हजार ९७० कोटी रुपयांच्या नव्या प्रकल्पाचा पर्याय पुढे आल्याचे सांगितले जात आहे. शेतकऱ्यांचे काय? जुन्या मार्गासाठी जमीन संपादन करून सातबारा उताऱ्यावर 'महारेल'ची नोंद झाल्यानंतर मार्ग बदलल्याने संबंधित जमिनींचे भवितव्य काय, शेतकऱ्यांच्या हक्कांचे काय आणि या जमिनींचा भविष्यात वापर कसा होणार, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

एकीकडे केंद्राची भूसंपादन अधिसूचना आणि दुसरीकडे मार्गाचा फेरविचार करण्यासाठी राज्य सरकारची उच्चस्तरीय समिती, या दुहेरी प्रक्रियेमुळे संगमनेर-अकोलेतील शेतकरी आणि नागरिकांचा संभ्रम वाढला आहे. त्यामुळे शासनाने रेल्वेच्या अंतिम मार्गाबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून भूसंपादनाच्या कात्रीत अडकलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# साहित्याच्या धाग्याने बांधली नाती

## संगमनेर साहित्यिक मंडळाचा अनोखा रक्षाबंधन सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -रक्षाबंधन म्हणजे केवळ बहीण-भावाच्या प्रेमाचे नाते नव्हे, तर प्रेम, स्नेह, विश्वास आणि आपुलकीच्या बंधनाचा उत्सव आहे. याच भावनेला साहित्यिक नात्याची सुंदर जोड देत संगमनेर साहित्यिक मंडळाच्या सभासदांनी रक्षाबंधनाचा आगळावेगळा कार्यक्रम उत्साहात साजरा केला.

संगमनेर साहित्यिक मंडळाचे मार्गदर्शक सदस्य मा. रमेश काका सराफ यांनी मंडळाच्या सभासदांनी एकत्र येऊन रक्षाबंधनाचा कार्यक्रम घ्यावा, अशी सूचना केली होती. या संकल्पनेला सभासदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानुसार शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी मा. पुष्पाताई निऱ्हाळी यांच्या उपस्थितीत हा सुंदर सोहळा संपन्न झाला.

यावेळी सभासदांनी एकमेकांना राखी बांधून साहित्याच्या नात्याचे, परस्पर स्नेहाचे आणि एकतेचे बंध अधिक दृढ करण्याचा संकल्प केला. या प्रसंगी डॉ. पेटकर, ज्ञानेश्वर गोंटे, महेश गोडसे, ज्ञानेश्वर राक्षे, बाळकृष्ण महाजन, मुकुंद डांगे, सुरेश परदेशी, डॉ. जी. पी. शेख, लक्ष्मण ढोले, राजेंद्र वेल्हाळ, रमेश काका सराफ, गिरीश सोमाणी यांच्यासह संगमनेर साहित्यिक मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्या एकमेकांच्या मनगटावर बांधली जाणारी राखी ही केवळ रेशमी धाग्याची नसेल; ती असेल साहित्यिक बंधाची, परस्पर स्नेहाची आणि एकतेची! या भावनेने कार्यक्रमाला विशेष अर्थ प्राप्त झाला.

साहित्य जोडतं... जगवतं... घडवतं... या विचाराला साकारत सभासदांनी एकमेकांशी असलेले साहित्यिक ऋणानुबंध अधिक घट्ट केले. शब्दांनी जोडलेली माणसे जेव्हा एका धाग्यात बांधली जातात, तेव्हा तो धागा केवळ मनगटावर राहत नाही, तर मनामनांत घट्ट विणला जातो, याचा प्रत्यय या कार्यक्रमातून आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प प्रमुख रमेश काका सराफ, सचिव ज्ञानेश्वर राक्षे आणि अध्यक्ष अरविंद गाडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. साहित्याचा धागा... सदैव जपू या! या संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वृक्षांना राखी बांधत मालदाड गावात अनोखे रक्षाबंधन साजरे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील डोंगरदऱ्या व निसर्गाने नटलेल्या मालदड गावात यावर्षी महिलांनी झाडांना राखी बांधत अनोख्या पद्धतीने पर्यावरण पूरक असे रक्षाबंधन साजरे केले आहे.

मालदाड येथील चैतन्य श्री कानिफनाथ महाराज देवस्थान इनाम परिसरात झाडांना राखी बांधून महिलांनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले आहे. रक्षाबंधन म्हणजे प्रेम ,आपुलकी आणि रक्षणाच्या भावनेचे प्रतीक असा सण आहे. याच भावनेला निसर्ग संवर्धनाची जोड देत यावर्षीचा रक्षाबंधनाचा सण महिलांनी निसर्गाच्या सानिध्यात साजरा केला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली मालदड गावात विविध विकासकामे झाली असून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड ही करण्यात आली आहे. त्यामुळे मालदड गाव आज हिरवाईने नटलेली आहे. वृक्ष हे आपले खऱ्या अर्थाने निस्वार्थी मित्र आहे. ते आपल्याला सावली, फळे ,फुले व जीवनावश्यक ऑक्सिजन देतात. वसुंधरेचे संवर्धन व संरक्षण करणे ही प्रत्येकाचीच नैतिक जबाबदारी असून त्याचे सर्वांनी पालन केले पाहिजे. वृक्षांप्रती कृतज्ञेची भावना म्हणून आज महिलांनी झाडांना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले आहे. पर्यावरण पूरक असा हा उपक्रम असून याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमाचे लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, आ. सत्यजित तांबे , डॉ. जयश्रीताई थोरात यांनी अभिनंदन केले आहे

# धनदांडग्यांना पायघड्या, शेतकऱ्यांवर हंटर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

न्याय सर्वांसाठी सारखा असला पाहिजे, परंतु तसे होत नाही. मोठ्या उद्योगपतींना सत्ताधाऱ्यांच्या जवळचे समजले जाते. त्यांना विशेष सवलत दिली जाते, परंतु सामान्य लोकांना आणि शेतकऱ्यांना त्यांच्यावर असलेल्या कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सक्ती केली जाते. नियम असा आहे की, कर्जदाराने जर कर्जाची रक्कम परत केली नाही, तर त्याच्या कर्जासाठी जामीन असलेल्या व्यक्तिकडून ती रक्कम वसूल करण्यात यावी. हा नियम धाब्यावर बसवून दिवाळखोरी ट्रिब्यूनलने झी ग्रुपचे संस्थापक सुभाषचंद्रा यांच्यावरील २२ हजार कोटीचे कर्ज केवळ ६.५ कोटी भरून 'सेटल' करण्यास मंजुरी दिली. यामुळे कर्ज देणा-या बँका आणि वित्तीय संस्थांना सुभाषचंद्रा यांच्याकडे थकित असलेल्या ९९.९७ टक्के रकमेचे नुकसान सहन करावे लागणार आहे. हे प्रकरण असे आहे की, काही कंपन्यांनी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्सकडून ७२६ कोटी रुपये कर्ज घेतले होते. या कर्जाचे जमानतदार सुभाषचंद्रा होते. जेव्हा या कंपन्यांनी कर्जाची रक्कम परत केली नाही, तेव्हा इंडियाबुलसने सुभाषचंद्रा यांच्याविरुद्ध कारवाई सुरू केली.

एनसीएलटीने अत्यंत कमी रकमेत सेटलमेंट केली. यावर विविध स्तरातून प्रतिक्रिया येऊ लागल्या. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एनसीएलटीला 'नेता कंपनी लूट ट्रिब्यूनल' म्हटले असून जर एखाद्या कर्मचा-याने कर्जाचा एक हप्ता जरी थकविला तरी त्या कर्मचाऱ्याकडून वसुली करण्यासाठी बँकेचे अधिकारी त्यांच्या घरी धडकतात. शेतकऱ्याने त्याच्याकडील ५० हजाराच्या कर्जाची परतफेड केली नाही, तर त्याच्या जमिनीचा लिलाव करण्यात येतो, परंतु काही मित्रांसाठी मात्र बँकाचा पैसा त्यांची खासगी संपती असते. सुभाषचंद्रा यांना कर्जफेडीसाठी जी सवलत देण्यात आली आहे, त्याव किंगफिशर एअरलाईन्सचे माजी मालक विजय माल्या यांनी म्हटले आहे की, माझ्याकडील ६,२०३ कोटी कर्जाच्या बदल्यात १४,१०० कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. दुप्पटीपेक्षा जास्त रक्कम वसूल केल्यानंतरही दिलासा मिळाला नाही, परंतु सुभाषचंद्रा यांच्याकडे २२,००० कोटी कर्ज असतानाही त्यांच्याकडून केवळ ६.५ रक्कम घेऊन त्यांचे कर्ज संपविण्यात आले आहे. हा कुठला न्याय आहे?


SR THORAT A Healthy Promise — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥ सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

FinanCity STOP THINKING START INVESTING
WE ARE HIRING !
JOIN OUR GROWING TEAM
Build your career with Financity and grow with the best.
APPLICATION DEADLINE: 31ST AUGUST 2026
BACK OFFICE - 25 POSITIONS(FEMALE)
• Data Entry & Documentation • Report Preparation • Office Support Tasks — ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)
ADMIN / HR2 POSITIONS(FEMALE)
• HR Generalist Role • Employee Coordination • HR Documentation — ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)
SALES MANAGER5 POSITIONS(MALE)
• Field Visit & Client Meeting • New Client Acquisition • Sales Target Achievement — ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)
12TH PASS CANDIDATES CAN ALSO APPLY
APPLY NOW !
Send your CV / Resume or call us now
9834087762 / 9623532907
Address: Seva Setu Kendra, Near Gravy Yard Hotel, Akole Bypass Road, Sangamner 422605.

पाहिजेत
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

कामासाठी मुले, मुली पाहिजेत
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा (वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME NAZMIN SHAKIL BAGWAN
NEW NAME AS, NAJMIN SHAKIL BAGWAN
UIDAI 379931529456
ADRESS - NEAR LAL BAWTA OFFICE MOMINPURA SANGAMNER 422605

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर

## संगमनेर नगरपालिकेतर्फे नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- नागरिकांना आपल्या परिसरातील प्रश्न आणि अडचणी थेट मांडता याव्यात आणि त्यावर वेळेत कार्यवाही करता यावी, यासाठी संगमनेर नगरपालिकेच्या वतीने १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबरदरम्यान प्रभाग समित्यांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात येत असून प्रत्येक प्रभागातील नागरिकांसाठी आपल्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे थेट व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे अशी माहिती नगरपालिका गटनेत्या दीपाली पंचारिया यांनी दिली.



या बैठका म्हणजे कोणताही 'जनता दरबार' नसून, नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न मांडावेत, त्यावर संबंधित अधिकारी व नगरसेवकांशी थेट चर्चा व्हावी आणि पुढील कार्यवाही निश्चित व्हावी, यासाठीचे व्यासपीठ आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील समस्या केवळ सांगून न थांबता त्या समस्यांची माहिती, आवश्यक असल्यास संबंधित कागदपत्रे किंवा प्रश्नांची यादी घेऊन बैठकीला यावे असे आवाहन करण्यात आले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन तसेच इतर नागरी सुविधांशी संबंधित प्रश्न नागरिकांना या बैठकीत मांडता येणार आहेत. प्रत्येक प्रभागातील नागरिकांचे प्रश्न समजून घेऊन त्यांची नोंद केली जाणार असून, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत त्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या बैठकींमध्ये संबंधित प्रभागातील नगरसेवकांसोबत नगरपालिका अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांना आपल्या समस्या थेट जबाबदार यंत्रणेसमोर मांडता येतील. प्रश्न समजून घेणे, त्याची नोंद करणे आणि त्यावर प्रत्यक्ष काम सुरू करणे, या पद्धतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या सूचनेनुसार नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा आणि त्यांच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्याचा हा उपक्रम आहे. नगरपालिका कार्यालयात नागरिकांनी येण्याची वाट पाहण्यापेक्षा अधिकारी आणि नगरसेवकांनी नागरिकांच्या प्रश्नांपर्यंत पोहोचणे, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे.

१ सप्टेंबरपासून २५ सप्टेंबरपर्यंत होणाऱ्या या प्रभागनिहाय बैठकींमध्ये सर्व प्रभागांतील नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्नांची माहिती घेऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

## समनापूर विकासासाठी दीड कोटींचा निधी -आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - बाळूमामा यांच्या नावाने कमान उभी करण्याची इच्छा भक्तमंडळाची होतीच; मात्र माझ्या हातून ही कमान पूर्ण व्हावी, अशी इच्छा बाळूमामांची होती. त्यामुळे कोणत्याही निधीची प्रतीक्षा न करता स्वखर्चातून या कमानीचे काम पूर्ण केले असून, आमदारकीच्या दीड वर्षाच्या कार्यकाळात समनापुर गावात दीड कोटीची कामे केली असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले

संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे बाळूमामा मंदिर कमानीचा लोकार्पण सोहळा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पानंद रस्ता समितीचे सदस्य म्हतु शेरमाळे माजी सरपंच भाऊसाहेब शेरमाळे शिवसेनेचे तालुका उपप्रमुख रणजीत जाधव संजय चांडे,मधुदादा शेरमाळे, भागवत हळनर , संपत गेठे भाऊ शेरमाळे, पांडुरंग शेरमाळे, रामनाथ केसकर, हौशीराम, शेरमाळे, काका साहेब गुंजाळ,अण्णा शेरमाळे, , रावसाहेब शेरमाळे, संदीप शेरमाळे, बाबू शिरमाळे, सुनील चांडे, एकनाथ शेरमाळे, मच्छिंद्र शेरमाळे, अबू इनामदार, ज्ञानदेव शेरमाळे, राजू शेरमाळे, बापू दळवी, देवा शेरमाळे राजू गायकवाड यांच्यासह, भाविक भक्त व ग्रामस्थ उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, आमदार होऊन मला दीड वर्ष झाले आहे. या कालावधीत समनापूर गावासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी दिला आहे. आगामी काळातही गावात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्याचा मानस आहे. शासनाच्या विविध योजना तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे.

गेल्या चाळीस वर्षांत कोणी काय दिले आणि काय दिले नाही, याची चर्चा मला करायची नाही. मात्र, तालुक्यात वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली विकासकामे पूर्ण करण्यावर आपला भर आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातूनही विविध विकासकामे मार्गी लावली जात आहेत. आता खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे शिवसेना-महायुतीमध्ये आले असून, त्यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासकामांसाठी निधी मिळण्याचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी निधीची अजिबात चिंता करू नये. पाणी, शिक्षण, आरोग्य, रस्ते तसेच तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याला सरकारच्या माध्यमातून प्राधान्य दिले जात आहे.

संगमनेर तालुक्यात आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला असून, तो सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठी कौठे मलकापूर येथे एमआयडीसी उभारण्याचे काम सुरू आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांची झालेली दुरवस्था लक्षात घेता आगामी काळात शाळांच्या दुरुस्तीचा उपक्रम हाती घेतला जाणार असल्याचेही आमदार खताळ यांनी सांगितले.

महायुती सरकार हे सर्वांचे सरकार आहे. या सरकारच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. गल्लीपासून दिल्लीपर्यंत आपले सरकार आहे. त्यामुळे मतदारसंघातील प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत.

### बाळूमामा कमानीचे दिमाखात लोकार्पण



## गंडा घालणारे दोघे भोंदू गजाआड

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता : शहरातील नगर-मनमाड रस्त्यावरील इशिता गिफ्ट गॅलरीमध्ये शिरून पैसे व सोन्याची अंगठी सिद्ध करून देतो' असा बहाणा करत महिला व्यापाऱ्याची ४५ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन भोंदू साधुंच्या राहाता पोलिसांनी अवघ्या काही तासांत मुसक्या आवळल्या आहेत. कोपरगाव रेल्वे स्टेशन परिसरातून या दोन्ही आरोपींना तातडीने ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राहाता येथील साई दर्शन टॉवरमध्ये 'इशिता गिफ्ट गॅलरी' नावाचे दुकान आहे. बुधवारी (२६ ऑगस्ट २०२६) दुपारी १२:१५ वाजेच्या सुमारास महिला व्यापारी दुकानात एकट्याच असताना भगवे कपडे घातलेले दोन हिंदी भाषिक इसम तेथे आले. महिला व्यापाऱ्याने त्यांना सुरुवातीला १० रुपये दक्षिणा दिली; परंतु भोंदू साधुंनी त्यांना बोलण्यात गुंतवून गल्ल्यातील पैसे सिद्ध करून देतो' असा बहाणा केला. आरोपींनी महिला व्यापाऱ्याला काउंटरबाहेर पैसे आणायला लावून गल्ल्यातील ५,००० रुपये रोख रक्कम हातचलाखीने स्वतःच्या झोळीत टाकली. त्यानंतर त्यांनी महिला व्यापाऱ्याच्या हातातील ४०,००० रुपये किमतीची, पुष्कराज खडा असलेली ६ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठीही सिद्ध करण्याच्या बहाण्याने काढून घेतली आणि तिथून पोबारा केला.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिला व्यापाऱ्याने गुरुवारी (२७ ऑगस्ट २०२६) राहाता पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) आणि ३(५) अन्वये गुन्हा (प्रथम खबर क्र. ०३४५/२०२६) दाखल केला.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा,नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# कै. गं. भा. लक्ष्मीबाई धोंडिबा ढोकरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## तृप्तीचा ढेकर देत आमची लक्ष्मीआई अनंतात विलीन झाली...





**मायेची सावली होती लक्ष्मीआई,**
**लेकरांसाठी झिजली, सुखाची आस नाही ।**
**दुःख सारे दडवुनी, संस्कार दीप लाविला,**
**नाती माणसे जोडुनी, संसार फुलविला ।**
**तृप्तीचा ढेकर देत, अनंतात विलीन झाली,**
**आई तुझ्या संस्कारांची ज्योत, अंतरी सदैव तेवली ।।**

आई... हा शब्द उच्चारला तरी मनाच्या कोपऱ्यात मायेची ऊब निर्माण होते. या एका शब्दात ममत्व आहे, त्याग आहे, संस्कार आहेत, आधार आहे आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर संकटांशी दोन हात करण्याचे बळही आहे. आई म्हणजे अशी सावली जी उन्हाची तीव्रता स्वतः सहन करून आपल्या लेकरांना मात्र गारवा देते. आमच्यासाठी आमची आई, कै. लक्ष्मीबाई धोंडिबा ढोकरे, अशीच होती. आयुष्यभर कुटुंबासाठी झिजलेली, दुःखाचे डोंगर स्वतःच्या काळजात दडवून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारी, परिस्थितीसमोर कधीही न झुकणारी आणि शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या लेकरांच्या भवितव्याची काळजी करणारी आमची लक्ष्मीआई अखेर तृप्तीचा ढेकर देत अनंताच्या प्रवासाला निघून गेली.

आजच्या धावपळीच्या आणि स्वकेंद्री होत चाललेल्या जीवनात 'गोतावळा' हा शब्दच जणू कालबाह्य होत चालला आहे. सावत्र, मावस, चुलत, मामेभाऊ, आतेबहीण, भाचे अशी नाती अनेकांना आता अनोळखी वाटू लागली आहेत. मात्र आमच्या आई-वडिलांच्या पिढीने ही नाती केवळ रक्ताच्या नात्यापुरती मर्यादित ठेवली नाहीत; त्यांनी ती मायेने, आपुलकीने, जबाबदारीने आणि माणुसकीने जगली.

अनाथ असो, बेवारस असो किंवा परिस्थितीने गांजलेला कोणीही असो, त्याला आपले मानून त्याच्या पाठीशी उभे राहणे, गरज पडली तर घरातील भाकरीचा तुकडाही त्याच्यासोबत वाटून खाणे, ही त्या पिढीची संस्कृती होती. त्या संस्कारांची शेवटची काही माणसं आता एक-एक करून काळाच्या पडद्याआड जात आहेत. त्यातीलच एक अनमोल मणी म्हणजे आमची लक्ष्मीआई.

वरुडीच्या फटांगरे कुटुंबातील गोविंद फटांगरे यांची कन्या लक्ष्मी, आमचे वडील धोंडिबा यांच्या संसारात जणू लक्ष्मीच्या पावलांनी आली. पठारावरच्या मोकळ्या हवेत वाढलेली ही मुलगी पुढे दऱ्याखोऱ्या, ओढे-नाले आणि तीव्र उतारांनी वेढलेल्या मुळा नदीच्या परिसरात आली. परिस्थिती वेगळी होती; आव्हाने वेगळी होती. पण तिच्या अंगी असलेली हुशारी, धार्मिक वृत्ती, सोशिकपणा, कष्टाची तयारी आणि माणसं जोडण्याची विलक्षण ताकद यामुळे तिने या मातीत आपली मुळे इतकी घट्ट रुजवली की तीच माती तिची कर्मभूमी आणि माणसं तिचे विश्व बनली.

सतत हसतमुख राहणे, मनमोकळेपणाने संवाद साधणे आणि आपल्या गोड, लाघवी वाणीने समोरच्याला क्षणात आपलेसे करून घेणे हा आईचा जणू दैवी गुणच होता. तिच्या चेहऱ्यावरचे हास्य अनेकदा घरातील दुःख झाकून टाकायचे. संकटे कितीही मोठी आली तरी ती कधी घाबरली नाही, डगमगली नाही. प्रत्येक संकटाकडे तिने श्रद्धेने, संयमाने आणि धैर्याने पाहिले. शेतीसाठी तुकड्या-तुकड्यांत विभागलेल्या मातीला आकार देत आणि संसाराचा गाडा ओढत असतानाच आमच्या संसारवेलीवर यमुना, दत्तात्रय, ज्ञानदेव, जनाबाई, देवराम, परशुराम आणि प्रदीप अशी सात फुलं उमलली. लेकरं वाढवणे, शेती सांभाळणे, घर चालवणे आणि नात्यांचा गोतावळा जपणे, हे सगळं आईने सहजतेने पेललं. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलांच्या गरजा पूर्ण करण्याला तिने नेहमीच प्राधान्य दिले.

वडिलांना पोथी-वाचन आणि ग्रंथ पारायणाची आवड होती. त्या धार्मिक वातावरणाचे संस्कार आमच्यावरही झाले. शाळेची पुरेशी सोय नसतानाही आम्ही लिहायला-वाचायला शिकलो. परीक्षांना बसलो आणि चांगले गुण मिळवले. मात्र आईच्या मनात एक खंत कायम होती- 'आपल्या मुलांना शिक्षणासाठी एवढ्या अडचणी का सहन कराव्या लागाव्यात?'

या एका विचाराने तिच्या मनात शिक्षणाची ज्योत तेवत राहिली. याच विचारातून माझ्या शिक्षणासाठी मला बदगी बेलापूर येथे चुलत आत्याकडे पाठवण्याचा निर्णय आई-वडिलांनी घेतला. आईपासून दूर जाण्याचा तो निर्णय सोपा नव्हता; पण माझ्या भवितव्यासाठी आईने स्वतःच्या मायेवर दगड ठेवला. त्या निर्णयाने माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. पुढे मी शिक्षणात यश मिळवत बोर्डात ३७ वा क्रमांक मिळवला. शिष्यवृत्ती मिळाली आणि इंजिनिअरिंगच्या शिक्षणाचे दरवाजे माझ्यासाठी खुले झाले. माझ्या त्या यशाने आई-वडिलांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. माझ्या यशामागे माझ्या आईच्या त्यागाचा, तिच्या कष्टांचा आणि तिच्या दूरदृष्टीचा वाटा किती मोठा आहे, हे शब्दांत मांडणे अशक्य आहे. मात्र नियतीला आमचा हा आनंद फार काळ पाहवला नाही.

ऊसाचे बियाणे घेऊन वडील बैलगाडीने शेताकडे जात होते. उतारावर गाडीच्या चाकाला दगड लागला. गाडीला जोराचा हिसका बसला आणि वडील खाली पडले. ऊसाने भरलेल्या बैलगाडीचे चाक त्यांच्या अंगावरून गेले आणि त्यातच त्यांच्या प्राणज्योतीने या जगाचा निरोप घेतला. तो क्षण आईच्या आयुष्यातील सर्वांत मोठा आघात होता.

पण आई रडत बसली नाही. तिने स्वतःच्या हृदयात दुःखाचे आभाळ दडवले आणि आम्हा लेकरांना सावरले. दोन मुली सासरी गेल्या होत्या आणि पाच मुलं तिच्या पदरात होती. वडिलांची साथ अचानक हिरावली गेली होती. संसाराचा आधारस्तंभ कोसळला होता. पण आईने स्वतःला सावरले आणि आम्हाला उभे करण्यासाठी पुन्हा नव्याने संघर्ष सुरू केला. ती शेतात राबली. घाम गाळला. संसाराला ठिगळं जोडली. कधी परिस्थितीपुढे हात टेकले नाहीत आणि आम्हा मुलांच्या स्वप्नांना कधी मरू दिले नाही.

ती आई होती... म्हणूनच हे सगळं शक्य झालं.

आम्ही मोठे झालो. प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात वाटचाल केली. नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी स्थिरावलो. काळ बदलला, परिस्थिती बदलली; पण आईने आम्हा पाच भावांना कधीही मनाने वेगळे होऊ दिले नाही. कुंतीने पांडवांना जसे एकतेच्या धाग्यात बांधून ठेवले, तसेच आईने आम्हा पाच भावांना प्रेमाच्या वज्रमुठीत बांधून ठेवले.

आज आमच्यात जी एकजूट आहे, एकमेकांविषयी जो जिव्हाळा आहे आणि सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची जी भावना आहे, त्याचे संपूर्ण श्रेय आईलाच द्यावे लागेल. मुलांच्या नोकरी-व्यवसायामुळे आम्हाला गावापासून दूर राहावे लागले. पण आईचा गावाशी असलेला जिव्हाळा कधीच कमी झाला नाही. कळमजाईच्या मंदिर परिसरात फिरताना तिच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान पाहणे, हे आमच्यासाठीही आनंदाचे क्षण असायचे. गावातील प्रत्येक माणसाशी तिचे नाते होते. गावातील सुख-दुःख तिच्या स्वतःच्या घरातील सुख-दुःखासारखेच होते.

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

गावात शाळा नसल्यामुळे आमच्या वाट्याला आलेल्या अडचणी आईच्या मनात शेवटपर्यंत जिवंत होत्या. 'आपल्या मुलांना जे सहन करावं लागलं, ते गावातील इतर मुलांना सहन करावं लागू नये,' हा तिच्या मनातील ध्यास होता. म्हणूनच तिने आम्हा पाचही भावांना गावातील जिल्हा परिषद शाळेच्या समस्यांकडे लक्ष देऊन त्या सोडवण्यासाठी सातत्याने आग्रह केला. तिच्यासाठी ते केवळ शाळेचे काम नव्हते; ते तिच्या आयुष्यभराच्या वेदनेला मिळणारे उत्तर होते. आज मातृभूमी फाऊंडेशनच्या माध्यमातून गावात उभे राहिलेले भव्य, आकर्षक आणि आधुनिक शैक्षणिक संकुल पाहताना आईच्या मनाला किती समाधान मिळाले असेल, याची कल्पनाही आम्ही करू शकत नाही. मात्र आपल्या आयुष्यात ज्या अडचणी आपल्या मुलांनी भोगल्या, त्या पुढच्या पिढीला भोगाव्या लागू नयेत, या तिच्या स्वप्नाला आकार आलेला पाहून तिने नक्कीच समाधानाने डोळे मिटले असतील, याची आम्हाला खात्री आहे.

आईने आयुष्यभर आम्हाला एकच शिकवले- नाती जपा... माणसं जोडा... संकटात खंबीर राहा... आणि आपल्या माणसांसाठी आयुष्यभर उभे राहा. आज ती आमच्यात प्रत्यक्ष नाही. तिचा हसरा चेहरा नाही. तिचा प्रेमळ आवाज नाही. डोक्यावरून फिरणारा मायेचा हात नाही. पण तिचे संस्कार आमच्या प्रत्येक श्वासात आहेत. आमच्या घरातील प्रत्येक नात्यात आहेत. आमच्या एकजुटीत आहेत. आमच्या प्रत्येक यशामध्ये आहेत. दगडधोंड्याची उशी करून संसार उभा करणारी, जनाईचे दास्यत्व मनात जपणारी, ज्ञान-वैराग्याचे प्रतीक असलेल्या दत्तात्रयाला शरण जाणारी, ज्ञानदेवाचा बंधुभाव जपणारी, परशुरामाच्या मातृभक्तीचा आदर्श देणारी आणि प्रदीपप्रमाणे आमच्या जीवनात संस्कारांची ज्योत तेवत ठेवणारी आमची लक्ष्मीआई... तिने आयुष्यभर आमच्यासाठी कष्ट केले. आमचं आयुष्य फुलावं म्हणून तिने स्वतःचं आयुष्य पणाला लावलं. स्वतःच्या इच्छा, अपेक्षा, सुख-दुःख यांचा कधी विचार केला नाही. लेकरांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच तिच्यासाठी आयुष्याचे अंतिम सार्थक होते.

म्हणूनच आज तिच्या जाण्याचे दुःख असले तरी मनाच्या एका कोपऱ्यात एक विलक्षण समाधान आहे.

आईने ज्यांच्यासाठी आयुष्यभर जगलं, त्या लेकरांना तिने स्वतःच्या पायावर उभं केलं.

कुटुंब एकत्र ठेवलं.

नाती जपली.

माणसं जोडली.

गावासाठी एक स्वप्न पाहिलं...

आणि ते स्वप्न साकार होताना स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलं. कदाचित म्हणूनच तिच्या जाण्याच्या क्षणीही मनात एकच भावना दाटून येते- तिने मृत्यूला नाही, तर आयुष्याला पूर्णत्व दिले.

तृप्तीचा ढेकर देत, समाधानाने, आपल्या लेकरांना सुखी आणि सक्षम पाहून... आमची लक्ष्मीआई अनंतात विलीन झाली आहे. आई, तू शरीराने आज आमच्यात नसशील; पण आमच्या संस्कारांत तू आहेस. आमच्या कुटुंबाच्या एकजुटीत तू आहेस. आमच्या प्रत्येक यशामध्ये तू आहेस. आमच्या प्रत्येक चांगल्या कृतीत तुझा आशीर्वाद आहे. आमच्या आठवणींच्या प्रत्येक पानावर तुझाच चेहरा आहे. तू दिलेली माया, तू दिलेले संस्कार आणि तू शिकवलेली माणुसकी हीच आमची खरी संपत्ती आहे.

आई, तुझ्या ऋणातून आम्ही कधीच मुक्त होऊ शकणार नाही. तुझ्या मायेची सावली आयुष्यभर आमच्या डोक्यावर राहो, हीच परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

**तुझ्या चरणी कोटी कोटी प्रणाम!**
**भावपूर्ण श्रद्धांजली, आई!**

तृप्तीचा ढेकर देत आमची लक्ष्मीआई अनंतात विलीन झाली... पण तिच्या संस्कारांची ज्योत आमच्या आयुष्यात सदैव तेवत राहील.

**- प्रदिप ढोकरे साहेब परिवार**
**संचालक, युनिव्हर्सल फोर्सेस प्रा.लि. पुणे**



॥ स्वर्गवास ॥
दि.२६/०८/२०२६



ऐसा जन्म लाभावा । देहवी चंदन व्हावा।।
आयुष्य संपले तरी । सुगंध दरवळत राहवा।।

प्रवचनकार



ह. भ. प. दत्तात्रय महाराज भोर
यांचे प्रवचन होईल

### कै. गं. भा. लक्ष्मीबाई धोंडिबा ढोकरे
यांना
### ॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥

**- दशक्रिया विधी -**
रविवार दि. ३०/०८/२०२६ रोजी
सकाळी ७.३० वाजता

**- शोकाकुल -**

| | |
|---|---|
| श्री. दत्तात्रय धोंडिबा ढोकरे | श्री. ज्ञानदेव धोंडिबा ढोकरे |
| श्री. देवराम धोंडिंबा ढोकरे | श्री. परशुराम धोंडिबा ढोकरे |
| श्री. प्रदिप धोंडिबा ढोकरे | सौ. यमुना रंगनाथ घोलप |
| सौ. जनाबाई दत्तात्रय शेळके | श्री. उमाजी म्हातारबा ढोकरे |
| श्री. भानुदास सावळेराम ढोकरे | श्री. रावजी गोविंद फटांगरे |

**समस्त ढोकरे परिवार आणि आप्तेष्ट**

**ठिकाण- मुळा नदीतिरी, कोठे खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**